# १७ वा जागतिक कृषी पर्यटन दिन

१६ मे हा दिवस , जागतिक कृषी पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो ,

यंदाचे सतरावे वर्ष असून ,जागतिक कृषी पर्यटन दिनाचा मुख्य कार्यक्रम , **बोल्झानो , उत्तर इटली** येथे संपन्न होत आहे , जागतिक कृषी पर्यटन दिनाचे औचित साधून **, युरॅक रिसर्च , ग्लोबल ऍग्री टुरिझम नेटवर्क , आणि कृषी पर्यटन विकास संस्था बारामती** या तीन संस्था एकत्र मिळून संयुक्त विद्यमाने - यंदा इटली येथे दुसरी **जागतिक कृषी पर्यटन परिषद** आयोजित केली आहे.

कृषी पर्यटन क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्था , सरकारे , विद्यापीठे , संशोधन करणारे प्राध्यपक ,शेतकरी वर्ग , संस्था सहभाग घेत आहेत , **७० देशातून ३८० प्रतिनिधी** उपस्थित राहणार आहेत ,

**जागतिक कृषी पर्यटन परिषदेची मुख्य संकल्पना आहे - कृषी पर्यटन आणि बरेच काही**

कृषी पर्यटन हि फक्त शेतीवर जाऊन पिठलं भाकरी खाणे , मौज मज्या करणे , एवढीच छोटी किंवा सीमित संकल्पना नसून , कृषी पर्यटन प्रकल्पामुळे अनेकानेक मोठ्या संधी निर्माण होत असून दिवसेन दिवस कृषी पर्यटनाची व्याप्ती जगभरात वाढत आहे

**कृषी पर्यटनाचे प्रमुख फायदे असे कि :**

- कृषी माल , व घरगुती पदार्थना मोठी बाजार पेठ निर्माण झाली आहे ,
- गावातील कलाकुसर तयार करणारे कारागीर यांच्या वस्तू , हातमाग कापड , क्राफ्ट्स आणि पेटिंग्स या वस्तुंना मार्केट उपलब्ध झाले आहे ,
- स्थानिक झाडे यांचे लागवड आणि संगोपन त्यामुळे पर्यावरण संतुलन , जतन व संवर्धन
- कृषी संस्कृतीचे व स्थानिक परंपरेचे जतन व संवर्धन
- गावातील शेतकरी कुटूंबाना शाश्वत रोजगार तसेच आर्थिक उत्पन्नाचे साधन निर्माण झाले आहे

- स्थानिक युवक तसेच महिला ना कृषी पर्यटन केंद्रावर रोजगार तसेच उदरनिर्वाहाचे साधन निर्माण झाले आहे
- जलसंधारण , पाणी बचत , या सारख्या योजना राबवल्या आहेत
- कृषी पर्यटन केंद्रवार स्वच्छता आणि फायदे याचे महत्व गावातील लोकांना पटले आहे
- पर्यटकांना अस्सल गावरान भोजन , तसेच खेड्यातील शेती , शिवार ,यांचा संपन्न अनुभव मिळत आहे
- शहरी आणि ग्रामीण यांचा मिलाप कृषी पर्यटन केंद्रामुळे होत आहे

दर वर्षी प्रमाणे यंदाही **कृषी पर्यटन संकल्पना राबवणारे शेतकरी , संस्था आणि व्यक्ती यांचा " वर्ल्ड ऍग्री टुरिझम अवॉर्ड्स २०२४" देऊन सन्मान केला जाणार आहे , २४ विविध देशातील ३७ अर्ज** या पुरस्कारासाठी प्राप्त झाले होते ,त्यातून निवड समितीने १० अर्जाची निवड केली आहे , या मध्ये खालील प्रमाणे शेतकरी **अमेरिकेतील ४ , भारतातील २ , अलाबामा येतील १ , ऑस्ट्रेलिया येथील २ , तैवान येथील १ यांची निवड झाली आहे.**

सर्व पुरस्कार बोल्झानो , उत्तर इटली येथील **जागतिक कृषी पर्यटन दिनाच्या मुख्य कर्यक्रमांत** वितरित केले जाणार आहेत , **या प्रसंगी ग्लोबल ऍग्री टुरिझम नेटवर्क च्या आजी माजी अध्यक्ष ,सचिव , तसेच युरॅक संस्थेचे चेअरमन , आणि कृषी पर्यटन विकास संस्थचे कार्यकारी संचालक उपस्थित राहणार आहेत**

**आपण स्थानिक पातळीवर जागतिक कृषी पर्यटन दिन कसा साजरा करू शकतो**

१. आपल्या पर्यटन केंद्र आणि आजूबाजूला गावात स्थानिक झाडे यांचे वृक्षारोपण करणे
२. गावातील इतर शेतकरी आणि महिला गावकरी यांना पाणी बचतीचे महत्व सांगणे
३. स्थानिक युवक व महिला तसेच कारागीर यांचा पदार्थ , आणि कला कुसर या साठी आपल्या पर्यटन केंद्रावर " शॉपिंग सेन्टर " सुरु करणे
४. कृषी संस्कृतीचे जतन व सर्वधन करणे
५. स्थानिक बी बियाणे यांची सीड बँक तयार करून शेतकरी यांना वितरित करणे
६. १६ मे - जागतिक कृषी पर्यटन दिन निम्मताने - पर्यटक आणि शेतकरी मेळावा घेणे आनंदात कृषी पर्यटन दिन साजरा करणे

**आपण नियोजन केलेल्या कार्यक्रमाचे फोटो आणि विडिओ समाज माध्यमावर प्रसारित करणे**

HASTTAG #worldagritourismday #globalagritourismnetwork

More information: 9226432980,

www.worldagritourismday.com